




दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३९२ वा बुधवार दि १७ जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# ३ वर्षे उलटली, तरी अहवाल नाही....!

## तत्कालीन मंडळ अधिकारी टेकाळे प्रकरणात तहसील कार्यालयाच्या चौकशीवरच प्रश्नचिन्ह

## तत्कालीन मंडळ अधिकारी तथा महसूल नायब तहसीलदार यांची पदोन्नती रहस्य उलगडा?

**जनसंचलन-बुलढाणा**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे उघड चौकशी प्रलंबित असताना तसेच अनोंदणीकृत ५२ फेरफार मंजूर केल्याच्या गंभीर तक्रारी प्रलंबित असताना तत्कालीन मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांना नायब तहसीलदार पदाच्या पदोन्नतीबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी तहसीलदार बुलढाणा यांना पुन्हा एकदा कडक पत्र देत सविस्तर चौकशी अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तक्रारकर्ते यांनी दि.२९ मार्च २०२३ रोजी याबाबत तक्रार अर्ज दाखल केला होता.या तक्रारीसोबत संबंधित फेरफारांच्या नक्कलाही जोडण्यात आल्या होत्या.त्यानंतर हे प्रकरण तहसीलदार कार्यालयाकडे चौकशीसाठी पाठविण्यात आले. विशेष म्हणजे तहसीलदार बुलढाणा व नायब तहसीलदार महसूल यांची संयुक्त समिती गठीत करण्यात आल्याचेही कळविण्यात आले होते. मात्र तब्बल तीन वर्षांचा कालावधी उलटूनही या गंभीर प्रकरणाचा स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल अद्याप उपविभागीय अधिकारी कार्यालयात सादर झालेला नाही. यामुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवरच आता गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.जर ५२ अनोंदणीकृत फेरफारांसारख्या प्रकरणातही चौकशी अहवाल वर्षानुवर्षे प्रलंबित राहत असेल,तर सामान्य नागरिकांनी न्यायाची अपेक्षा कुणाकडून करायची? चौकशीचा विलंब हा दोषींना संरक्षण देण्याचा प्रकार तर नाही ना,असा सवाल उपस्थित होत आहे. उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदारांना स्पष्ट







निर्देश देत मा. विभागीय आयुक्त,अमरावती यांच्या पत्रातील मुद्द्यांनुसार संबंधित मंडळ अधिकाऱ्यांची नियमानुसार सविस्तर चौकशी करून अहवाल विनाविलंब त्वरित सादर करण्यास सांगितले आहे. आता तहसील कार्यालय या पत्रानंतर तरी जागे होणार का,की हा अहवालही फाईलमध्येच धूळ खात पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तत्कालीन वादग्रस्त बहुचर्चित मंडळ अधिकारी तथा नायब तहसीलदार विजय दत्तात्रय टेकाळे यांची एसीबी विभागाकडून गोपनीय चौकशी पूर्ण होऊन खुली चौकशी सुरू असतांना टेकाळे यांनी केलेल्या सर्व नियमबाह्य कामांचे पुरावे देऊनही पदोन्नती? बुलडाणा महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी कारवाईस दिरंगाई का करीत आहेत हे न सुटणार कोड आहे.या टेकाळे प्रकरणात जो कोणी अधिकारी (गोलमाल) पांघरून टाकत असेल त्यांचा ही खुलासा आम्ही पुढील सत्रात प्रकाशित करणार आहोत!

# संतनगरी शेगावात योगी पॅटर्नची मागणी जोरात! पेठ मोहल्ल्यात घरात घुसून मारहाण, दगडफेक; १९ जणांवर गुन्हे दाखल

**जनसंचलन-शेगाव**

सध्या देशभरात चर्चेत असलेला उत्तर प्रदेश पॅटर्न आता संत नगरी शेगावातही लागू करावा, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे. कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, गुन्हेगारी प्रवृत्तीला थेट लगाम बसावा, अशी भावना शेगावकरांमध्ये व्यक्त होत आहे. पेठ मोहल्ला परिसरात दोन दिवसांपूर्वी पशुकतलीच्या कारणावरून दोन गटांत वाद निर्माण झाला. या वादाचे पुढे दगडफेक आणि घरात घुसून मारहाणीमध्ये रूपांतर झाल्याने संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या प्रकरणी




दोन्ही बाजूंनी परस्पर तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, एकूण १९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या तक्रारीत शेख मजिद शेख इसाक, वय ३२, रा. पेठ मोहल्ला, शेगाव यांनी म्हटले आहे की, १० जून रोजी १४ ते १५ जणांनी संगनमत करून त्यांच्या घरात घुसून मारहाण केली. दगडाने डोक्यावर वार झाल्याने ते जखमी झाले असून, त्यांच्या भावालाही मारहाण झाल्याचा आरोप आहे. घरासमोर दगडफेक करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. दुसऱ्या तक्रारीत सैयद जमीर सैयद सैलानी, वय ५०, रा. पेठ मोहल्ला यांनी सांगितले की, आठ ते दहा जणांनी घरात घुसून शिवीगाळ केली आणि घरासमोर दगडफेक केली. विट लागल्याने त्यांच्या डोळ्याखाली दुखापत झाली, तर पुतण्यालाही मारहाण झाल्याचा आरोप आहे. दोन्ही प्रकरणांत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमे आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आता पोलिसांनी केवळ गुन्हे दाखल करून थांबू नये, तर अशा कायदा हातात घेणाऱ्यांवर कायद्याच्या चौकटीत कठोर कारवाई करावी, अशी मागणी जनतेतून होत आहे.

# राजकारणातल्या शेल कंपन्या

आजवर उद्योग-व्यवसायाच्या क्षेत्रात पहावयास मिळणाऱ्या ङ्गशेलफ अर्थात नामधारी-कागदोपत्री किंवा बनावट कंपन्यांचा राजकारणातही उदय झाल्याचे नवे चित्र देशातील मतदारांना पहावयास मिळाले आहे. तृणमूल काँग्रेसच्या खासदारांच्या फुटीर गटाचे त्रिपुरातील ङ्ग नॅशनलिस्ट सिटीझन्स पार्टी ममध्ये (एनसीपी) विलिनीकरण झाल्याची घोषणा करण्यात आली. त्यामुळे इतके दिवस अडगळीत पडलेल्या या पक्षाचे भाग्य उजळले असून, आता तो नव्या २० खासदारांसह रातोरात देशातील पाचव्या क्रमांकाचा पक्ष बनला आहे. एकीकडे तृणमूल काँग्रेससह विविध राज्यांतील काँग्रेसजन पुन्हा मूळ काँग्रेसमध्ये परतण्याच्या चर्चा-अफवांनी विरोधकांना आनंदाच्या उकळ्या फुटत असतानाच ङ्गतृणमूलफच्या खासदारांनी नवाच झेंडा खांद्यावर घेतला. लोकसभेच्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश खासदारांचे पाठबळ असतानाही त्यांना या नव्या पक्षाचे कुंकू लावण्याची गरज का भासली, असे विलिनीकरण कायदेशीर आहे का, अशा प्रश्नांवरून न्यायालयीन लढाई बराच काळ चालेल आणि त्यात पक्षांतरबंदी कायद्यातील तरतुदींचा कीसही पाडला जाईल. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांची ङ्गऑपरेशन लोटसफनुसार शस्त्रक्रिया झाली. आता त्यांनाही ङ्गतृणमूलफच्या फुटीतून विलयाचा मार्ग दिसल्यास आणि अशा मार्गाने नशीब उजळून घेण्याची संधी देशातील दोन हजारांहून कागदोपत्री पक्षांना खुली झाल्यास नवल नाही. कायद्यातील पळवाटा शोधणारी मंडळी दिवसेंदिवस ङ्गस्मार्टफहोऊ लागल्याचेच हे निदर्शक म्हणावे लागेल.

पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुकीत झालेल्या दारूण पराभवातून सावरण्याची संधी मिळण्याआधीच पक्षाला फुटीचे ग्रहण लागले. राज्यातल्या सत्तेचे कवच निखळताच पक्षातील असंतुष्टांनी उचल खाल्ली आणि ८० पैकी ६० आमदारांनी वेगळ्या गटाची घोषणा केली. त्यापाठोपाठ पक्षाच्या २८ पैकी २० खासदारांनीही नेतृत्वाला सोडचिठ्ठी दिली. एकूण संख्येपैकी दोन तृतीयांश सदस्य पाठीशी असताना स्वतंत्र गट म्हणून बसण्याऐवजी या खासदारांना नव्या पक्षाची गरज का भासली, असा प्रश्न पडू शकतो; मात्र पक्षांतरबंदी कायद्यानुसार बहुसंख्यांचा पाठिंबा असला, तरी या गटाला पक्षाचे विलिनीकरण भाग आहे; त्यासाठी या पक्षाची निवड झालेली दिसते. या पक्षाने पूर्वीच्या निवडणुकीत ङ्गदलबदलूंना नाकारा,फ असा प्रचार केला होता. मात्र, सर्व उमेदवारांना ङ्गनोटाफपेक्षा कमीअधिक मते मिळाली. अखेर ङ्गतृणमूलफमधील दलबदलूंनीच एका रात्रीत या ङ्गस्टॉलफच्या ङ्गमॉलफ बनवला. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनीसुद्धा ङ्गही माहिती माध्यमांतूनच कळली,फ असे आश्चर्य व्यक्त केले. अर्थात, ङ्गमहाशक्तीफच्या आशीर्वादाने त्यांच्याही आश्चर्यावर पडदा पडेल आणि लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडूनही साऱ्या घटनाक्रमावर शिक्कामोर्तब होईल, अशीच चिन्हे आहेत. निवडणुकीतील पराभवानंतर त्यातील सत्ताजीवी गोतावळा नव्या सत्ताकेंद्रांभोवती घोटाळू लागतो. संस्थापक नेत्यांच्या एकखांबी तंबूचा आधार कमकुवत झाल्याने डोलारा कोसळण्यास वेळ लागत नाही. मग त्यांच्या कुटुंबातील



नव्या पिढीवर एकाधिकारशाहीचे आरोप सुरू होतात आणि वेगवेगळ्या आरोप-प्रत्यारोपांमधून फुटीची बीजे रोवली जातात. त्यामुळेच ममता बॅनर्जी यांनी गेली २८ वर्षे स्थापलेला आणि वाढवलेला हा पक्ष फुटण्यास २८ दिवसही लागले नाहीत. पक्षांतरबंदी कायद्यातील तरतुदींवर देशात प्रचंड मंथन झाले आहे. आतासुद्धा काही कायदेतज्ज्ञांच्या मते संसदीय किंवा विधिमंडळ पक्ष नव्हे, तर मूळ पक्षाचेच विलिनीकरण कायद्याला अपेक्षित आहे. खरे तर ङ्गज्या पक्षाच्या चिन्हावर नागरिकांनी मते दिली, तो पक्ष सोडताना त्याने दिलेल्या पदांचा राजीनामा द्यावा आणि पुन्हा जनतेचा कौल मागावा,फहा या कायद्याचा आत्मा. मात्र, एवढा वेळ आणि नैतिकतेची बूज आहे कोणाला? त्यामुळेच त्या भानगडीत कोणी पडत नसावेत. कायद्यातील तरतुदींपेक्षा पळवाटाच जास्त झाल्या आहेत. आपला पक्ष किंवा नेत्यांचे विचार न पटणे आणि त्यातून पक्ष व नेत्यांच्या वाटा वेगळ्या होणे; अगदी पराभव होताच सत्ताधाऱ्यांच्या गोटात जाऊन बसण्याची तीव्र इच्छा होणे, हेसुद्धा लोकशाहीमधील भिन्न मतांच्या तत्त्वाशी सुसंगतच मानता येईल; मात्र जनतेने दिलेल्या मतांशी द्रोह कोणत्याही अर्थाने समर्थनीय नाही.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कॉक्रोच जनता पार्टीच्या संस्थापकाला मारहाण; राजस्थानमध्ये आंदोलनावेळी हल्ला

■ जयपूर/वृत्तसंस्था

कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना मारहाण झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. जयपूर, राजस्थानमध्ये आंदोलन सुरु असताना १५ जून रोजी दिपकेंना मारहाण करण्यात आली. या मारहाणीचा व्हिडीओ समोर आला असून, दिपकेंना खांद्यावर घेतले असताना काही जणांनी त्यांच्यावर हात उचलला असल्याचे दिसत आहे.

नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिपके गेल्या काही दिवसांपासून आवाज उठवत आहेत. पुण्यातून सुरु झालेले हे आंदोलन सोमवारी (१५ जून) जयपूर राजस्थान मध्ये दाखल झाले. पण, मार्गदर्शन करण्यापूर्वी दिपकेंना मारहाण करण्यात आली. याप्रकरणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, दिपकेंना खांद्यावर घेतल्यानंतर काही जणांनी त्यांना मारहाण केल्याचे व्हिडीओत दिसत आहे. दिपकेंचा स्कार्फ ओढून त्यांना कानशिलात लगावल्याचे व्हिडीओत दिसत आहे.



चारवेळी त्यांना तोंडावर मारहाण केल्याचा दावा केला जात आहे. त्यांना समर्थकाच्या खांद्यावरुन खाली ओढण्याचा प्रयत्न देखील झाल्याचा दावा केला जात आहे. यानंतर घटनास्थळी मोठा तणाव निर्माण झाला होता.

## मारहाण करणाऱ्यास अटक

■ सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपक शहीद स्मारकाजवळ पोहोचताच तरुणांमध्ये झटापट झाली. दीपक यांना खांद्यावर उचलून आत नेले जात होते. यावेळी जमावातील दोन तरुणांनी त्यांना थप्पड मारली. सीजेपीच्या सदस्यांनीही त्या तरुणांना मारहाण केली. थप्पड मारणाऱ्यांना पोलिसांनी अटक करून ताब्यात घेतले आहे.

दिपकेंना मारहाण झाल्यानंतर घटनास्थळी मोठा तणाव निर्माण झाला. उपस्थित जमावाने हल्लेखोरांना ताब्यात घेत त्यांना देखील चोप दिल्याचे समोर आले आहेत. दरम्यान, घटनेनंतर दिपके यांनी जमावाला शांत राहण्यास सांगताना दिसत आहेत. तसेच, ज्यांनी मारहाण केली त्यांना सोडून द्या, त्यांना कोणत्याही प्रकारे मारहाण करु नका, असे आवाहन दिपके यांनी उपस्थितांना केले.

# 'आरटीआय' कार्यकर्ता नवा व्यवसाय झाला!

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

रस्ता बांधकामाच्या कामात सरकारी कर्मचाऱ्याला अडथळा आणल्याचा आरोप असलेल्या एका माहिती अधिकार (आरटीआय) कार्यकर्त्याचा अटकपूर्व जामीन सर्वोच्च न्यायालयाने १५ मे रोजी फेटाळला. हा जामीन फेटाळताना, माहिती अधिकार कार्यकर्ता असणे हा आता एक नवा व्यवसाय बनला आहे, अशी तोंडी टिप्पणी न्यायालयाने केली.

या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि त्याच्या एका साथीदारावर चालू असलेल्या रस्ता बांधकामाच्या कामात अडथळा आणल्याचा आरोप आहे. काम करून घेणाऱ्या पर्यवेक्षकाला (सुपरवायझर) आणि मजुरांना धमकावले होते. सुपरवायझरला मारहाण केली आणि त्याच्या साथीदाराने लाथा बुक्क्यांनी मारले, असाही त्यांच्यावर आरोप आहे. यासोबतच त्यांनी तिथे काम करणाऱ्या मजुरांना जातीवाचक शिवीगाळ केली. या सर्व प्रकारानंतर त्यांच्यावर नवीन कायद्यानुसार (भारतीय न्याय संहिता) मारहाण व सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल, तसेच 'अ‍ॅट्रॉसिटी कायद्या'अंतर्गत (अनुसूचित जाती-जमाती छळ प्रतिबंधक कायदा) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर माहिती अधिकार कार्यकर्ते राकेश कुमार बेहल यांनी जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल



केली होती. यावर न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

खंडपीठातील न्यायमूर्ती मेहता म्हणाले, आरटीआय कार्यकर्ते असणे हा आता एक नवा व्यवसाय झाला आहे. केंद्र सरकारने निधी दिला आहे, रस्ता बांधकामाची काळजी सरकार घेईल. तुम्ही कोणीही नाही आहात. कसले हे तथाकथित आरटीआय कार्यकर्ते! हे म्हणजे 'यलो जर्नलिझम' (पित्त पत्रकारिता) आहे. अर्ज फेटाळण्यात येत आहे. न्यायमूर्ती बिश्नोई यांनी देखील बेहल यांच्या रस्ता बांधकामाच्या देखरेखीवर (मॉनिटरिंग) प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, या सर्व रस्त्यांच्या कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही कोणी वरिष्ठ अधिकारी आहात का?, असा सवाल त्यांनी केला.

# पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून

■ मुंबई/वृत्तसंस्था

महाराष्ट्र विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनाचे सविस्तर वेळापत्रक ठरवण्यासाठी सोमवारी मुंबईत 'कामकाज सल्लागार समितीची' महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, राज्याचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत मुंबईत होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, आगामी पावसाळी अधिवेशनाचे कामकाज एकूण तीन आठवडे चालणार आहे. या तीन आठवड्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयके, जनहिताचे प्रश्न आणि शासकीय कामकाज पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सध्या राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जमाफी, आगामी निवडणुका आणि



राजकीय घडामोडी पाहता हे तीन आठवड्यांचे पावसाळी अधिवेशन अत्यंत वादळी ठरण्याची शक्यता आहे. विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून सरकारला कोंडीत पकडण्याची तयारी केली असून, सत्ताधारी पक्ष देखील विरोधकांना चोख उत्तर देण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यामुळे २२ जूनपासून मुंबईत हायव्होल्टेज राजकीय रणसंग्राम पाहायला मिळणार आहे.

# १४ कलमी करार; अखेर युद्ध थांबले : होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार

■ तेहरान/वृत्तसंस्था

अमेरिका आणि इराण यांच्यात 14 कलमी शांतता करार झाला असून, 19 जून रोजी स्वित्झर्लंडमधील एका कार्यक्रमात त्यावर अधिकृतपणे स्वाक्षरी केली जाईल, अशी माहिती पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी दिली. त्यामुळे आता अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध थांबले आहे. होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार असल्याचे संकेत मिळतात.

पाकिस्तानचे पंतप्रधान शरीफ सोमवारी म्हणाले, सखोल वाटाघाटींनंतर आम्हाला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, अमेरिका आणि इस्लामिक प्रजासत्ताक इराण यांच्यात शांतता करार झाला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, दोन्ही बाजूंनी लेबनॉनसह सर्व



आघाड्यांवरील सैन्य कारवाया त्वरित आणि कायमस्वरूपी थांबवण्याची घोषणा केली आहे. याबाबतचा अधिकृत स्वाक्षरी कार्यक्रम शुक्रवारी, 19 जून रोजी स्वित्झर्लंडमध्ये होईल, असेही ते म्हणाले. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही प्रतिक्रिया दिली. अमेरिका आणि इराण यांच्यात एका महत्त्वपूर्ण करारावर स्वाक्षरी करण्यात येईल. हा करार धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'ला (होर्मुझची सामुद्रधुनी) त्वरित पुन्हा खुले करण्याचा मार्ग मोकळा करेल. त्यामुळे दीर्घकाळापासून एकमेकांचे विरोधक असलेल्या या दोन देशांमधील राजनैतिक संबंधांमध्ये मूलभूत बदल घडवून येतील, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता करार पूर्ण झाल्याची घोषणा केली. सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' मार्गावरील नौदल नाकेबंदी त्वरित उठवून तो मार्ग पुन्हा खुला करण्याची घोषणाही त्यांनी केली. या निर्णयामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्याचा मुक्त प्रवाह पुन्हा पूर्ववत होईल, असे त्यांनी सांगितले. इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणसोबतचा करार आता पूर्ण झाला आहे.

## इस्रायलचा शांतता करार मान्य करण्यास नकार

इस्रायलने अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता करार स्वीकारण्यास नकार दिला आहे. संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी असेही स्पष्ट केले आहे की, त्यांचे सैन्य दक्षिण लेबनॉनमधून माघार घेणार नाही; तसेच लेबनॉन, सीरिया आणि गाझा येथे निर्माण करण्यात आलेल्या सुरक्षा क्षेत्रांमध्ये इस्रायली सैन्य अनिश्चित काळासाठी तैनात राहील. दरम्यान, इस्रायलचे राष्ट्रीय सुरक्षा मंत्री इतामार बेन-ग्विर यांनी या शांतता कराराबाबत नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, आम्ही अमेरिकेचे गुलाम नाही. इस्रायल हा एक स्वतंत्र देश आहे आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा हा करार इस्रायलला लागू होत नाही.

# पत्नीला घरात बांधून ठेवलं, तापत्या चटके दिले; पीडिता साखळदंडासह पोहोचली पोलीस स्थानकात!

**राजगढ/वृत्तसंस्था**

मध्यप्रदेशातील राजगढ जिल्ह्यातून एक मन सुन्न करणारी आणि अंगावर काटा आणणारी क्रूर घटना समोर आली आहे. एका नराधम पतीने आपल्या पत्नीला घरात ओलीस ठेवून तिच्यावर अमानुष अत्याचार केले. तिला घरातल्या खांबाला साखळदंडाने कुलूप लावून बांधून ठेवले, गरम लोखंडी गजाने तिच्या शरीरावर चटके दिले. मात्र, या नरकयातनेतून अत्यंत धाडसाने सुटका करून घेत, गळ्यात तोच साखळदंड अडकलेल्या अवस्थेत या महिलेने तब्बल ६ किलोमीटरची पायपीट केली आणि थेट पोलीस ठाणे गाठले. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला बेड्या ठोकल्या आहेत. मांगीबाई तन्वर असे या पीडित महिलेचे नाव असून, आरोपी पतीचे नाव सरदार सिंग तन्वर आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १० जूनच्या रात्री मांगीबाईंचा पती सरदार सिंग दारू पिऊन घरी आला आणि त्याने घरगुती वादातून पत्नीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. मांगीबाईंनी याला विरोध केला असता, नराधम पतीने घराबाहेर जाऊन झाडाची जाड फांदी तोडून आणली आणि मांगीबाईंना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. पतीच्या या अमानुष मारहाणीला कंटाळून मांगीबाईंनी पोलिसात जाण्याचा निर्णय घेतला आणि त्या




रात्रीच्या अंधारातच घराबाहेर पडल्या. त्या खिलचीपूर पोलीस ठाण्याच्या दिशेने चालत निघाल्या होत्या. मात्र, वाटेतच एका मंदिरापाशी पतीने त्यांना गाठले, तिथे पुन्हा बेदम मारहाण केली आणि बळजबरीने ओढत घरी आणले.

घरी आणल्यानंतर पतीने क्रूरतेच्या सर्व सीमा ओलांडल्या. त्याने मांगीबाईंच्या गळ्यात जाड लोखंडी साखळदंड गुंडाळून त्याला कुलूप लावले आणि साखळीचे दुसरे टोक घरातल्या एका खांबाला बांधून ठेवले. "आता बघतोच तू पोलिसात कशी जातेस आणि माझ्याविरुद्ध तक्रार कशी करतेस," असं म्हणत त्याने तिला आव्हान दिलं. गॅसवर गज तापवून दिले चटके; मदतीसाठी कोणीही आलं नाही साखळदंडाने बांधून ठेवल्यानंतरही पतीचा राग शांत झाला नव्हता. त्याने स्वयंपाकघरातील गॅस शेगडीवर लोखंडी गज लालभडक होईपर्यंत तापवला आणि मांगीबाईंच्या कमरेवर, पाठीवर आणि मांडीवर त्याचे चटके दिले. मांगीबाई वेदनेने विव्हळत होत्या, ओरडत होत्या, पण त्यांच्या मदतीला कोणीही धावून आले नाही. पुढील २४ तास मांगीबाई त्या नरकयातनेत घरातच कैद होत्या. यादरम्यान, पती गावात पंचायत बोलावून मांगीबाईवर पोलिसात न जाण्यासाठी दबाव आणण्याची तयारी करत होता. स्वतःचा जीव वाचवण्यासाठी मांगीबाईंनी वरवर पतीचे ऐकण्याचे नाटक केले, पण मनातल्या मनात त्या सुटकेची संधी शोधत होत्या. शेवटी ती सुटकेची संधी अखेर चालून आली. पती सरदार सिंग गावकऱ्यांना पंचायतीसाठी गोळा करायला घराबाहेर पडला. घर रिकामे असल्याचे पाहून मांगीबाईंची नजर कोपऱ्यात पडलेल्या एका दगडावर गेली. त्यांनी तो दगड उचलला आणि गळ्यातल्या कुलूपावर प्रहार करण्यास सुरुवात केली.

अनेक प्रहारांनंतर अखेर ते कुलूप तुटले नाही, पण साखळीची एक कडी सैल झाली आणि घरातून त्यांची सुटका झाली. गळ्यातून साखळी पूर्णपणे काढणे शक्य नव्हते, त्यामुळे गळ्यात साखळदंड आणि लटकणारे कुलूप तशाच अवस्थेत ठेवून त्यांनी थेट पोलीस ठाण्याच्या दिशेने धाव घेतली.

रात्रीचा किर्रर अंधार, निर्जन रस्ता आणि शेतातल्या पायवाटांवरून मांगीबाई जीवाच्या आकांताने धावत होत्या. पायात चप्पल नव्हती, काट्याकुट्यांमुळे पाय रक्तबंबाळ झाले होते. वाटेत जे लोक भेटले, त्यांना गळ्यात साखळी असलेली महिला पाहून ती मानसिकदृष्ट्या आजारी असावी असे वाटले. त्यामुळे भीतीपोटी कोणीही मदत केली नाही. मात्र, एका संवेदनशील वाटसरूने तिची भयानक अवस्था पाहून तिला खाण्यासाठी काहीतरी दिले. त्या बळावर मांगीबाईंनी कसेबसे पोलीस ठाणे गाठले.

रात्री १० च्या सुमारास जेव्हा मांगीबाईंनी खिलचीपूर पोलीस ठाण्यात प्रवेश केला, तेव्हा तिथले अनुभवी पोलीस अधिकारीही हादरले. एका महिलेच्या गळ्यात लोखंडी साखळदंड आणि कुलूप लटकत होते, शरीरावर चटक्यांचे ताजे आणि गंभीर व्रण होते आणि ती भीतीने थरथर कापत होती. पोलिसांना पाहताच तिला रडू कोसळले.

पोलिसांनी तात्काळ संवेदनशीलतेने तिच्या गळ्यातील साखळी काढली आणि तिला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवले. वैद्यकीय अहवालात तिच्यावर झालेल्या अमानुष अत्याचाराची पुष्टी झाली आहे. पतीने ज्या साखळदंडाचा वापर मांगीबाईंचा आवाज दाबण्यासाठी आणि त्यांना कैदेत ठेवण्यासाठी केला होता, अखेर मांगीबाईंनी त्याच साखळदंडाला आपल्यावरील अत्याचाराचा सर्वात मोठा जिवंत पुरावा बनवून पतीला तुरुंगाची हवा खायला लावली. त्यांच्या या अद्भूत धाडसाचे सध्या सर्वत्र कौतुक होत आहे.

## लव जिहादचे पालघर तालुक्यात चार प्रकार,आरोपी अटकेत

**पालघर/वृत्तसंस्था**

अल्पसंख्यांक समाजाच्या तरुणांकडून हिंदू धर्माच्या मुली व महिलांना लग्नाचे व अन्य आमिष दाखवून शारीरिक संबंध ठेवणे तसेच फसवणूक केल्याचे चार प्रकार अलीकडच्या काळात पालघर परिसरात घडले असून चारही प्रकरणात आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. यापैकी तीन प्रकरणांमध्ये पॉक्सो कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आले असून हिंदुत्ववादी संघटना कारवाई करण्यासंदर्भात आक्रमक झाल्याचे दिसून आले आहे.

केळवे परिसरात राहणाऱ्या एका २९ वर्षीय महिले सोबत मंदिरामध्ये लग्नाचा बनाव करून अनेक महिलांशी संबंध असणाऱ्या एका पुरुषाने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. शिवाय या महिलेकडून सुमारे पावणेचार लाख रुपये घेऊन आर्थिक फसवणूक करण्यात आली असल्याची तक्रार दीड महिन्यापूर्वी करण्यात आली होती. या प्रकरणात आरोपी ला पुण्यामधून पकडण्यात आले होते.

गेल्या पंधरवड्यात पालघर येथील एका १७ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून बोईसर शिवाजीनगर येथील एका २४ वर्षीय तरुणाने बेटेगाव येथील एका हॉटेलमध्ये शारीरिक संबंध स्थापित केले होते. आपली मुलगी कोणाशी तरी प्रेमसंबंधात अडकल्याचे समजल्यानंतर तिच्या आईने तिचे लग्न लावून देण्याची खोटी तयारी दर्शवली. मात्र त्यावेळी सर्वांसमक्ष संबंधित मुलाशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता त्या तरुणाने आपण लग्न करू शकणार नाही असे सांगून या प्रकरणातून अलिप्त राहण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांच्या



मार्फत पोलिसांना पाचारण करून संबंधित तरुणाला बोईसर एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतले. पालघर शहरात आणखी उच्च मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलींना दोन वेगवेगळ्या अल्पसंख्यांक मुलांनी फसवून शारीरिक संबंध ठेवल्याचे माहिती पुढे आल्यानंतर पोलिसांच्या मदतीने या दोन्ही तरुणांना पॉक्सो कायद्याअंतर्गत अटक करण्यात आली आहे.

पालघर तालुक्यामधील सुमारे एक ते दीड महिन्याच्या कालावधीत तरुणांची फसवणूक करून शारीरिक शोषण करण्याचे प्रकार उघड झाले असून विश्व हिंदू परिषद तसेच बजरंग दलाने अशा प्रकरणात पुढाकार घेऊन पोलिसांच्या मदतीने तक्रार दाखल करण्यात आली आहे. डहाणू शहरात लव जिहाद प्रकरणात सर्व हिंदुत्ववादी संस्थांनी एकत्र येऊन कडकडीत बंद पाळला होता. या पार्श्वभूमीवर पालघर मध्ये देखील वातावरण तापू लागले आहे.

काही अल्पसंख्यांक समाजाच्या मुलांकडून हिंदू धर्माच्या अल्पवयीन तरुणींना वेगवेगळ्या प्रकारचे आमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याची त्यांच्या पालकांकडून माहिती प्राप्त झाली होती. अशा पालकांना मदत हवी या उद्देशाने बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने पोलिसांना पाचारण करून तक्रारी नोंदवण्यात आली. पालघर मधील सर्व चार प्रकरणांमध्ये आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

## 'दान' मोजणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकही रडारवर; राम मंदिरातील दान चोरी प्रकरणी एसआयटी

**अयोध्या/वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेश सरकारने अयोध्या राम मंदिरातील दान चोरी प्रकरणी विशेष तपास पथकाची नेमणूक केली आहे. या एसआयटीने सोमवारी सकाळी मंदिर परिसरात पोहचली. त्यांनी दान मोजणाऱ्या विभागातूनच आपल्या तपासाची सुरूवात केली आहे.

एसआयटीने श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टला कर्मचाऱ्यांच्या नावांची यादी आणि त्यांचे पत्ते देखील मागवून घेतले. तसेच गेल्या वर्षी दान मोजण्याच्या प्रक्रियेत सामील असलेल्या लोकांची देखील माहिती मागवली आहे. मंदिरात काम मिळाल्यापासून या कर्मचाऱ्यांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांची संपत्ती आणि आर्थिक प्रगती देखील तपासाच्या कक्षेत आली आहे. या एसआयटीचे नेतृत्व लखनौ विभागाचे आयुक्त विजय विश्वास पंत करत आहेत. या पथकात लखनौ रेंजचे आयजी किरण एस आणि अर्थ विभागाचे विशेष सचिव नीलरत्न कुमार यांचा देखील समावेश आहे. किरण एस हे नुकतेच सीबीआयचे डेप्युटेशन पूर्ण करून आले आहेत. तर नीलरत्न यांना अकाऊंटिंगच्या कामाचा



अनेक वर्षाचा अनुभव आहे. राम मंदिर ट्रस्टने भाविकांनी दान केलेल्या पैशाची चोरी झाल्याच्या प्रकरणी सरकारकडे चौकशीची मागणी केली होती. त्यानंतर सरकारने सात दिवसात प्राथमिक आणि १५ दिवसात पूर्ण अहवाल देण्यास सांगितले आहे. सरकारने फक्त कथित हेराफेरी नाही तर पूर्ण व्यवस्थेची तपासणी करण्यासाठीच एसआयटी स्थापन केली असून ते सर्व अँगलने या प्रकरणाचा तपास करणार आहेत.

## उड्डाणानंतर काही वेळातच विमान कोसळले; १२ ठार

**बटलर/वृत्तसंस्था**

अमेरिकेतील मिसुरी राज्यात स्कायडायव्हर्सना घेऊन जाणारे एक छोटे विमान उड्डाण केल्यानंतर काही वेळातच कोसळले. हा अपघात इतका भीषण होता की, विमानात असलेल्या सर्व 12 जणांचा मृत्यू झाला.

हा अपघात 'बटलर मेमोरियल एअरपोर्ट'जवळ झाला. बटलर हे शहर कॅन्सस सिटीपासून दक्षिणेस सुमारे 60 मैलांवर स्थित आहे. विमानात असलेल्या सर्वांचा मृत्यू झाल्याची खातरजमा प्राथमिक अहवालांतून झाली. मृतांमध्ये 11 स्कायडायव्हर्स आणि वैमानिकाचा समावेश आहे. ते स्कायडायव्हिंगच्या मोहिमेवर होते; उड्डाणानंतर विमानाला अपेक्षित उंची गाठण्यापूर्वीच हा अपघात झाला. विमान 'बटलर मेमोरियल एअरपोर्ट'वरून उड्डाण करत होते. अपघाताच्या कारणाचा तपास सुरू करण्यात आला आहे. यूएस फेडरल एव्हिएशन अॅडमिनिस्ट्रेशननुसार, कोसळलेले विमान 'पॅसिफिक एरोस्पेस पी-750 या मॉडेलचे होते.



### दोन हेलिकॉप्टर हवेत धडकले; सहा मृत्यू

ब्राझीलमधील रिओ डी जनेरियो येथे रविवारी सकाळी दोन हेलिकॉप्टर हवेत एकमेकांवर आदळून अपघातग्रस्त झाले. दोन्ही हेलिकॉप्टर शहराच्या पश्चिम भागात असलेल्या एका इलेक्ट्रिक वाहन डीलरशिपच्या पार्किंगमध्ये कोसळले. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. अग्निशमन दलाच्या माहितीनुसार, टक्कर झाल्यानंतर हेलिकॉप्टरला आग लागली, जी पाहता पाहता पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या गाड्यांपर्यंत पसरली. आगीच्या भक्ष्यस्थानी किमान 20 वाहने जळून खाक झाली.

# सुपर ओव्हरमध्ये श्रीलंकाकडून भारताचा पराभव

## वैभव सूर्यवंशीचा लंकन खेळाडूला धक्का तर तिलक वर्माही पंचांना भिडला

■ डम्बुला/वृत्तसंस्था

सोमवारी झालेल्या त्रिकोणीय मालिकेतील सामन्यात श्रीलंका 'अ' संघाने भारत 'अ' संघाचा 'सुपर ओव्हर'मध्ये पराभव केला. सुपर ओव्हरमध्ये लंकन संघाने 16 धावा केल्या, तर प्रत्युत्तरात भारताला केवळ 9 धावा करता आल्या. तत्पूर्वी, भारत 'अ' संघ 49.2 षटकांत 265 धावांवर सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात श्रीलंका 'अ' संघानेही 50 षटकांत 265 धावा केल्या. सामन्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि श्रीलंकेच्या खेळाडूंमध्ये वाद झाला. या घटनेदरम्यान सूर्यवंशीने श्रीलंकेच्या एका खेळाडूला धक्काही दिला. याशिवाय, तिलक वर्मा आणि अंपायर यांच्यातही बाचाबाची झाल्याचे पहायला मिळाले.

प्रारंभी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या टीम इंडियाची सुरुवात खराब झाली. प्रभसिमरन सिंग आणि वैभव सूर्यवंशी स्वस्तात बाद झाले. पण नंतर ऋतुराज गायकवाड आणि तिलक वर्मा यांनी 52 धावांची भागीदारी केली. पण तिलक 21 धावांवर बाद झाला. आयुष बडोनीही 15 धावांवर माघारी परतला, तर निशांत सिंधूला 6 धावा करता आल्या. एक बाजू सांभाळलेल्या ऋतुराजला 37 धावांवर विजयकांत वियस्कांतने पायचीत केले. अनुकूल रॉय 8 धावांवर बाद झाला. पण अखेर सूर्यांश शेडगे आणि विपराज निगम या दोघांनी 104 धावांची भागीदारी करताना अर्धशतके केली. सूर्यांशने 66 चेंडूत 3 चौकार आणि 2 षटकारांसह 72 धावा केल्या, तर विपराजने 49 चेंडूत 6 चौकारांसह 51 धावांचे योगदान दिले. यामुळे भारत अ संघाला 49.2 षटकात सर्वबाद 265 धावांपर्यंत पोहोचता आले.

विजयी आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेने डावाची सुरुवात करण्याआधीच त्यांच्या खात्यात 10 धावा जोडण्यात आल्या. भारताकडून फलंदाजी करताना विपराज निगमकडून दोनदा खेळपट्टीवर धावण्याची चूक घडली. त्यामुळे पंचांनी त्याबाबत कारवाई करताना 10 धावांची पेनल्टी लावली. निरोशन डिकवेला आणि अविष्का फर्नांडो यांनी डावाची चांगली सुरुवात केली. पण आक्रमक खेळणाऱ्या फर्नांडोला





निशांत सिंधूने 5 व्या षटकात त्रिफळाचीत केले. त्यानंतर विशेन हलमबागे 17 धावांवर पायचीत झाला. सदिरा समरविक्रमाने सर्वाधिक 7 चौकारासह 93 धावांची खेळी साकारली. त्याला तळाच्या फलंदाजांनी मोलाची साथ दिली. पण शेवटच्या षटकात अर्शद खानने सदिरा समरविक्रमाला त्रिफळाचीत करत भारताच्या आशा पल्लवित केल्या. समरविक्रमा 113 चेंडूत 93 धावांची खेळी केली. दरम्यान, शेवटच्या 1 चेंडूत 2 धावांची गरज होती. त्यावेळी अर्शद खानने टाकलेल्या चेंडूवर चमिका गुनसेकराने शॉट खेळण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर दोन धावा पळण्याच्या नादात गुनसेकरा 18 धावांवर धावबाद झाला. पण त्याने शॉट खेळला नसल्याचे भारतीय संघाचे म्हणणे होते. चेंडू पॅडला लागला असल्याचे म्हणणे होते. त्यामुळे पहिली धावही ग्राह्य धरली जाऊ नये असे भारताचे म्हणणे होते. पण अखेर जवळपास 5 मिनिटांच्या चर्चेनंतर एक धाव ग्राह्य धरली गेली आणि श्रीलंकाही 50 षटकात 9 बाद 265 धावा केल्या आणि सामना टाय झाला.

### सुपरओव्हरचा थरार

■ सुपरओव्हरमध्ये प्रथम फलंदाजी करताना लंकन अ संघाने 16 धावा केल्या. भारताकडून वैभव सूर्यवंशी आणि सूर्यांश शेडगे हे दोघे खेळायला आले. वैभव फटकेबाजी करण्यात माहिर आहे. त्यामुळे वैभव इथेही त्याची कमाल दाखवेल असे अपेक्षित होते, मात्र तसे काहीच झाले नाही. सूर्यांश आणि वैभव या दोघांना सुपर ओव्हरमध्ये 9 धावाच करता आल्या. श्रीलंकेने सुपरओव्हरमध्ये विजयाला गवसणी घातली.

# भारतीय महिला हॉकी संघाची विजयी सलामी

■ ऑकलंड/वृत्तसंस्था

आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या 2026 च्या महिलांच्या नेशन्स चषक हॉकी स्पर्धेत भारतीय महिला हॉकी संघाने अमेरिकेचा अ गटातील पहिल्या सामन्यात 3-2 अशा गोलफरकाने निसटता पराभव करत विजयी सलामी दिली.





या सामन्यात भारतातर्फे दीपिकाने 2 गोल तर नवनीत कौरने 1 गोल केला. अमेरिकेतर्फे ॲश्ले सेसा आणि मॅडेलिन झिमेर यांनी प्रत्येकी 1 गोल नोंदविला. या सामन्यात दीपिकाला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

खेळाला सुरुवात झाल्यानंतर चौथ्याच मिनिटाला ॲश्ले सेसाने मैदानी गोल करुन अमेरिकेचे खाते उघडले. सातव्या मिनिटाला अमेरिकेला पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि त्यांच्या झिमेरने या संधीचा पुरेपूर फायदा घेत अमेरिकेला 2-0 अशी आघाडी मिळून दिली. खेळाच्या पहिल्या सत्रात अमेरिकेने भारतावर 2-0 अशी आघाडी घेतली होती. खेळाच्या दुसऱ्या सत्रामध्ये भारतीय संघाने आक्रमक खेळावर अधिक भर दिला. 17 व्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि दीपिकाने गोल नोंदवून अमेरिकेची आघाडी थोडी कमी केली. 24 व्या मिनिटाला भारताला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला. दीपिकाने या संधीचाही फायदा घेत आपल्या संघाला 2-2 अशी बरोबरी साधून दिली. दीपिकाचा हा दुसरा गोल ठरला. 28 व्या मिनिटाला भारताला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला. नवनीत कौरने भारताचा तिसरा गोल नोंदवून अमेरिकेवर आघाडी घेतली. मध्यंतरापर्यंत भारताने अमेरिकेवर 3-2 अशी आघाडी मिळविली होती. खेळाच्या उत्तरार्धात दोन्ही सत्रामध्ये गोल नोंदविले गेले नसल्याने भारताने हा सामना जिंकला. या विजयामुळे भारतीय संघ आता अ गटात तीन गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. या गटात जपानने तीन गुणांसह सरस गोलसरासरीच्या जोरावर पहिले स्थान मिळविले आहे. आता भारताचा या स्पर्धेतील पुढील सामना जपानबरोबर मंगळवारी 16 जून रोजी खेळविला जाईल.

# स्वीडनकडून ट्युनिशियाचा ५-१ ने धुव्वा

■ मॉंटेरी, मेक्सिको/वृत्तसंस्था

यासिन अयारीने दोन गोल केले आणि स्वीडनने ट्युनिशियाचा 5-1 असा धुव्वा उडवत गट 'एफ'मध्ये अव्वल स्थान पटकावले. या कामगिरीतून त्यांनी आपण 2026 चा विश्वचषक जिंकण्यास पात्र असल्याचे पुरेपूर सिद्ध केले.

अलेक्झांडर इसाक आणि व्हिक्टर ग्योकेरेस यांनी प्रत्येकी एक गोल केला आणि एक गोल करण्यात मदत केली. तसेच मॅटियास स्वानबर्गनेही स्वीडनसाठी गोल नोंदवला. जागतिक क्रमवारीत 39 व्या स्थानावर असलेल्या स्वीडनने आठ वर्षांपूर्वी रशियामध्ये झालेल्या विश्वचषकात उपांत्यपूर्व फेरी गाठली होती, मात्र 2022 च्या विश्वचषकासाठी त्यांना पात्रता मिळवता आली नव्हती. जागतिक क्रमवारीत 45 व्या स्थानावर असलेल्या ट्युनिशियासाठी ओमर रेकिकने गोल केला. ट्युनिशियाचा हा सातवा विश्वचषक सहभाग आहे, परंतु त्यांना आजवर कधीही गट फेरीच्या पुढे मजल मारता आलेली नाही. एस्तादियो बीबीव्हीए स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात स्वीडनच्या गोलची सुऊवात आणि शेवट अयारीनेच केला. त्याने सातव्या मिनिटाला आणि दुसऱ्या सत्रातील स्टॉपेज टाइममध्ये लांब अंतरावरून गोल केले.

सामन्याच्या 30 व्या मिनिटाला इसाकने आपला 18 वा आंतरराष्ट्रीय गोल केला, जेव्हा ग्योकेरेसने एका प्रतिहल्ल्यावर लिव्हरपूलच्या या आघाडीपटूला चेंडू दिला. हा आघाडीपटू मागच्या मोसमात पाय मोडल्यामुळे बराच काळ संघाबाहेर होता. इसाकने आतल्या बाजूला कट करून एक खालून फटका हाणला, जो ट्युनिशियन गोलरक्षक मौहिब चमाखच्या हातांना चुकवून गोलपोस्टमध्ये गेला. 43 व्या मिनिटाला रेकिकने गोल करून स्वीडनची गती रोखल्यानंतर इसाक आणि ग्योकेरेसने स्वीडनला पुन्हा सामन्यावर नियंत्रण मिळवून दिले.

# जपानकडून नेदरलँड्सला रोखण्याचा पराक्रम; शेवटी साधली २–२ अशी बरोबरी

## कामादा यांनी नोंदवला जपानचा बरोबरीचा गोल

■ आर्लिंग्टन, टेक्सास/वृत्तसंस्था

दाइची कामाडा आणि त्याचे जपानी सहकारी विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात पराभवाच्या उंबरठ्यावर होते. प्रतिस्पर्धी नेदरलँड्सचा दर्जा पाहता हा पराभव अनपेक्षित ठरला नसता. पण हा सामना जपानने जबरदस्त प्रतिकार करत 2-2 असा बरोबरीत सोडवत युरोपियन संघाला धक्का दिला.

सामना बरोबरीत सोडवणारा दायची कामादाचा गोल त्याच्या मायदेशात दीर्घकाळ लक्षात ठेवला जाईल. विशेषतः जर फुटबॉलमध्ये चांगली लय असलेला हा देश पुन्हा 16 संघांच्या फेरीपर्यंत पोहोचला तर हा गोल जास्तच स्मरणात राहील. या गोलमुळे जपानी चाहते जल्लोषात न्हाऊन निघाले आणि त्यांनी जागतिक क्रमवारीत वरच्या स्थानावर असलेल्या नेदरलँड्सविरुद्धची लढत बरोबरीत सोडवली.

एटी अँड टी स्टेडियमवर उपस्थित असलेल्या प्रेक्षकांसाठी सुऊवातीचा निस्तेज खेळ उत्तरार्धात वेगाने बदलला. 64 व्या मिनिटाला समरव्हिलेने जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानावर असलेल्या डच संघाला दुसऱ्यांदा आघाडी मिळवून दिल्यानंतर जपानच्या आशा मावळत चालल्या होत्या. पण त्यानंतर 88 व्या मिनिटाला ओगावाने कॉर्नर किकवर अचूक हेडर मारून सामना बरोबरीत आणला. चेंडू कामाडाच्या डोक्याला स्पर्श करून गोलरक्षक बार्ट वर्ब्रुजेनच्या बाजूने गेला. वर्ब्रुजेनने झेप घेत चेंडूला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला, पण गोल होण्यापासून तो रोखू शकला नाही.

त्यापूर्वी 50 व्या मिनिटाला डच कर्णधार व्हॅन डाइक याने पेनल्टी क्षेत्राच्या आत पुढे झुकत मारलेल्या हेडरवर हाणलेला चेंडू गोलपोस्टच्या उजव्या खांबाला आदळून गोलमध्ये गेला.

हा त्याचा 13 वा आंतरराष्ट्रीय गोल ठरला. त्यानंतर सात मिनिटांनी 18 व्या क्रमांकावर असलेल्या जपानच्या नाकामुराने प्रत्युत्तर दिले, ताकेफुसा कुबोकडून पास मिळाल्यावर त्याने पेनल्टी क्षेत्राबाहेरील



अर्धवर्तुळाकार रेषेच्या डाव्या बाजूने वळून वर्ब्रुजेनला चकवत जोरदार फटका मारला. पुन्हा सात मिनिटांनंतर समरव्हिलेने रायन ग्रेव्हनबर्गकडून पास घेतला आणि डाव्या पायाने झायॉन सुझुकीला चकवत गोलपोस्टच्या डाव्या बाजूच्या खांबाच्या दिशेने फटका मारला आणि त्यावर चेंडू आदळून गोलमध्ये गेला.

# विजय यांच्यावर पत्नीचे व्याभिचाराचे आरोप, घटस्फोटाची सुनावणी 7 ऑगस्टपर्यंत पुढे ढककली

तामिळनाडूचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी विधानसभेच्या निवडणूकीत आपल्या टीव्हीके पक्षाचा करिश्मा दाखवला. देशभरात विजय यांच्या जादूची चर्चा झाली. पण आज विजय वेगळ्या कारणाने चर्चेत आहेत. अभिनेत्री तृषा कृष्णनसोबत प्रेमसंबंधांची चर्चा असतानाच आता विजय यांच्या घटस्फोटाची आणि कोर्टातील खटल्याची चर्चा सुरु आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि अभिनेते विजय आणि त्यांच्या पत्नी संगीता सोरनालिंगम यांच्या घटस्फोटाच्या खटल्याची सुनावणी सोमवार, १५ जून रोजी न्यायालयात शांतपणे पार पडली. चेंगलपट्टू महिला न्यायालयाने सुनावणी तहकूब केली असून पुढील सुनावणी ७ ऑगस्ट रोजी निश्चित केली आहे.

न्यायालयाच्या निर्देशानुसार विजय आणि संगीता दोघेही सकाळी १०:३० च्या सुमारास सुनावणीला उपस्थित होते. त्यांची उपस्थिती असूनही, दोन्ही पक्षांमध्ये कोणतीही मोठी घडामोड, निर्णय किंवा तोडगा न निघता सुनावणी संपली. संगीता यांनी त्यांच्या २७ वर्षांच्या वैवाहिक जीवनाचा अधिकृतपणे शेवट करण्यासाठी घटस्फोटाची याचिका दाखल केली होती.

संगीता सोरनालिंगम यांनी अभिनेते-राजकारणी विजय यांच्या विरोधात चेंगलपट्टू येथील कौटुंबिक न्यायालयात अधिकृतपणे घटस्फोटाची याचिका दाखल केली आहे. या जोडप्याने १९९८ मध्ये यूकेमध्ये त्यांच्या लग्नाची कायदेशीर नोंदणी केली होती, त्यानंतर १९९९ मध्ये चेन्नई येथे पारंपरिक पद्धतीने विवाह केला होता. कायदेशीर दाखलपत्रात विजयवर १९५४ च्या विशेष विवाह कायद्यांतर्गत व्यभिचार आणि क्रूरतेचा आरोप करण्यात आला आहे. संगीताचा दावा आहे की, एप्रिल २०२१ मध्ये तिला समजले की विजय एका अज्ञात अभिनेत्रीसोबत संबंधात होता. जरी याचिकेत नावाचा उल्लेख नसला तरी, त्याचे नाव त्याची सह-अभिनेत्री त्रिशा कृष्णनसोबत जोडले जात आहे .





याचिकेत असा दावा करण्यात आला आहे की, संबंध संपवण्याचे वारंवार आश्वासन देऊनही, विजय त्या अभिनेत्रीसोबत प्रवास करणे आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये हजेरी लावणे सुरूच ठेवत होता. संगीता यांनी यावर प्रकाश टाकला आहे की, विजयचा कोणताही आक्षेप नसताना ती अभिनेत्री नियमितपणे त्यांच्या भेटीगाठींचे फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत असे, ज्यामुळे तिला आणि त्यांच्या मुलांना तीव्र सार्वजनिक अपमान आणि भावनिक त्रास सहन करावा लागला या याचिकेत पुढे विवाहसंबंधातील गंभीर बिघाडाचा तपशील दिला आहे, ज्यात विजयकडून भावनिक अलिप्तता आणि शाब्दिक तिरस्काराचा उल्लेख आहे. संगीता यांनी 'रचनात्मक परित्याग' या कायदेशीर संकल्पनेचा आधार घेतला आहे, आणि म्हटले आहे की विजयने घरातील वातावरण इतके प्रतिकूल बनवले की, तो त्याच्या सार्वजनिक आणि राजकीय कारकिर्दीवर लक्ष केंद्रित करत असताना तिला एकाकी पडून वेगळे जीवन जगण्यास भाग पडले. इतकेच नाही, तर तिने आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप केला आहे, ज्यात तिने दावा केला आहे की विजयने तिच्यावर कठोर आर्थिक मर्यादा घातल्या, तिच्या हालचालींवर निर्बंध घातले आणि तिला मिळणाऱ्या नियमित घरगुती सुविधा बंद केल्या. लग्न वाचवण्याचे प्रयत्न अखेरीस अयशस्वी ठरले. कागदपत्रांवरून असे दिसून येते की, संगीताने ऑगस्ट २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान कायदेशीर नोटिसा आणि वैयक्तिक चर्चेद्वारे समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या जोडप्याची शेवटची भेट ९ नोव्हेंबर २०२५ रोजी झाली. संगीताचे म्हणणे आहे की, हे लग्न आता दुरुस्त न होण्याइतके तुटले आहे आणि ते केवळ कागदावरच उरले आहे. या प्रकरणाची सुनावणी सुरुवातीला २० एप्रिल रोजी होणार होती. तथापि, विजय आणि संगीता या दोघांनीही ती तारीख टाळली आणि त्याऐवजी त्यांच्या वकिलांना त्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पाठवले. त्यांच्या अनुपस्थितीनंतर, कौटुंबिक न्यायालयाने त्या दोघांनाही १५ जून रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीसाठी व्यक्तिशः उपस्थित राहण्याचा आदेश दिला.

## जेनिफर विंगेट करणार दुसरा विवाह



जेनिफर विंगेट स्वत:च्या घटस्फोटाच्या सुमारे 11 वर्षांनी पुन्हा विवाहावरून चर्चेत आली आहे. जेनिफर स्वत:च्या आयुष्यातील नवा टप्पा सुरू करण्यास तयार आहे. जेनिफर ही इस्माइल विलियमसोबत विवाहबद्ध होणार आहे. विलियमने जेनिफरला विवाहासाठी विचारणा केली होती, ज्याला जेनिफरने होकार दिला आहे. आता दोघेही विवाहासाठी नियोजन करत आहेत. जेनिफर अन् इस्माइल दोघेही ख्रिश्चन पद्धतीने विवाहबद्ध होणार असून हा सोहळा सप्टेंबर-ऑक्टोबर किंवा डिसेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. सध्या दोघेही विवाहासाठी योग्य ठिकाण निवडत आहेत. इस्माइल हा सिंगापूर येथील उद्योजक आहे. इस्माइलसोबत जेनिफर मागील काही काळापासून डेटिंग करत आहे. दोघेही परस्परांना अत्यंत पसंत करतात असे सांगण्यात येत आहे.

जेनिफर यापूर्वी अभिनेता करण सिंह ग्रोवरची पत्नी होती आणि 2012 मध्ये विवाहबद्ध या जोडप्याने 2015 साली घटस्फोट घेतला होता. तर घटस्फोटानंतर करण सिंह ग्रोवरने अभिनेत्री बिपाशा बासूसोबत विवाह केला होता.

## "माझे सगळे पैसे ह्यानेच खाल्ले..", अक्षय कुमारला फराह खान सर्वांसमोर असं का म्हणाली ?

फराह खानने 'मै हूँ ना' या चित्रपटातून दिग्दर्शनात पदार्पण केलं होतं आणि मग 'ओम शांती ओम' हा ब्लॉकबस्टर दिला. त्यानंतर आपला तिसरा चित्रपट 'तीस मार खान'मध्ये फराह खानने अक्षय कुमारबरोबर काम केलं. २०१० मध्ये प्रदर्शित झालेला हा कॉमेडी चित्रपट बॉक्स ऑफिसवर सरासरी हिट ठरला होता, मात्र त्यावेळी समीक्षकांनी त्यावर प्रचंड टीका केली होती. या टीकेचा आपल्यावर खूप मोठा परिणाम झाला, अशी कबुली फराह खानने दिली आहे.




गेल्या काही वर्षांत मात्र अनेकांना हा चित्रपट आवडला, त्यामुळे त्याचा एक वेगळा चाहता वर्ग तयार झाला आहे. आता फराहने या चित्रपटाच्या शूटिंगची रंजक आठवण सांगितली. अक्षय कुमार शुटिंगसाठी दररोज हेलिकॉप्टरने यायचा, असं फराह खान म्हणाली. फराह खान, अक्षय कुमार, प्रियदर्शन आणि राजपाल यादव त्यांच्या आगामी 'भूत बंगला' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी एकत्र आले होते. यावेळी गप्पा मारताना फराह आणि अक्षयने 'तीस मार खान'च्या माळशेज घाटातील शूटिंगच्या आठवणींना उजाळा दिला. फराह म्हणाली, "आम्ही माळशेजमध्ये 'तीस मार खान'चे शूटिंग करत होतो. रोज सकाळी ८ वाजताचा कॉलटाइम असायचा. मुंबईपासून हे ठिकाण अडीच तासांच्या अंतरावर आहे, त्यामुळे सर्वजण तिथेच मुक्कामी असायचे. पण अक्षय मात्र रोज संध्याकाळी पॅक-अप झाल्यावर घरी जायचा आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ७:४५ वाजता सेटवर हजर असायचा." फराहचा हा खुलासा ऐकून राजपाल यादव थक्क झाला. त्यांच्याकडे पाहत फराह आणि अक्षय दोघांनी विचारलं, "सांग बरं कसं ते?" राजपालला काहीच सुचेना. तेव्हा अक्षय म्हणाला, "मी हेलिकॉप्टरने प्रवास करायचो." त्याचं हे उत्तर ऐकून सगळेच हसायला लागले.

## लागोपाठ फ्लॉप चित्रपटांमुळे शाहिद कपूरने घेतला महत्त्वपूर्ण निर्णय; स्वतः खुलासा करत म्हणाला, "यापुढे एकटा..."

बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूर हा त्याच्या आगामी 'कॉकटेल २' चित्रपटाचे जोरदार प्रमोशन करत आहे. या चित्रपटामध्ये तो अभिनेत्री क्रिती सेनॉन व रश्मिका मंदाना यांच्यासह झळकणार आहे. शाहिद कपूर हा बॉलीवूडमध्ये वर्षानुवर्षे काम करीत असून, त्याने अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. त्याचा मोठा चाहता वर्ग आहे; मात्र मागील वर्षांमध्ये शाहिद कपूरचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट होऊ शकले नाहीत. चित्रपट फ्लॉप होत असल्यामुळे शाहिदने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असल्याचे सांगितले.





काही दिवसांपासून अभिनेता शाहिद कपूर याचे काही चित्रपट फ्लॉप ठरले आहेत. त्याचे 'देवा' व 'ओ रोमिओ' या दोन्ही चित्रपटांची प्रदर्शनाआधी बरीच चर्चा रंगली होती; मात्र बॉक्स ऑफिसवर त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. या अनुभवातून आपण एक महत्त्वाची गोष्ट शिकलो असून, आता चित्रपटांची निवड करताना वेगळा विचार करीत असल्याचे शाहिदने सांगितले आहे.

मुलाखतीत शाहिद कपूर म्हणाला की, चित्रपटांना अपेक्षित यश न मिळाल्यामुळे स्क्रिप्ट निवडण्याची पद्धत बदलली आहे. आता चित्रपटाची कथा किंवा नॅरेशन एकट्याने ऐकत नाही, तर माझ्या टीममधील काही लोकांनाही बरोबर घेऊन जातो, असा खुलासा शाहिद कपूरने केला आहे. पुढे शाहिद कपूर म्हणाला, "मी माझ्या टीमला आता एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली आहे. कदाचित चित्रपटाची स्क्रिप्ट निवडण्याचा निर्णय मी एकट्याने घेऊ नये. कॅमेऱ्यासमोर काय करायचे हे मला चांगले माहीत आहे; पण कोणता चित्रपट निवडायचा याबाबत मी नेहमीच योग्य असेन, असे नाही. त्यामुळे आता मी नॅरेशन एकट्याने ऐकण्याऐवजी खोलीत आणखी तीन-चार जण असावेत, यावर भर देतो. त्यामुळे एखाद्या कथेचा विचार फक्त माझ्या दृष्टिकोनातून होणार नाही," असे स्पष्ट मत अभिनेता शाहिद कपूरने मांडले आहे. स्वतःच्याच अलीकडील काही चित्रपटांच्या अपयशाबद्दल बोलताना शाहिद कपूर म्हणाला की, अभिनेता म्हणून आपण जे काम करतो, त्यावरही आपले पूर्ण नियंत्रण नसते. एखादा सीन कसा दिसेल, फ्रेम कशी असेल हे दिग्दर्शक ठरवतो आणि त्यालाही त्या कामाबद्दल समाधान वाटणे महत्त्वाचे असते, असे मत अभिनेता शाहिद कपूरने व्यक्त केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाण्यात अवैध मद्यविक्री विरोधात धडक मोहीम; ११० गुन्हे, १४.६८ लाखांचा मुद्देमाल जप्त

जनसंचलन/बुलढाणा

पुणे जिल्ह्यात मिथेनॉलमिश्रित विषारी दारू सेवनामुळे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने बुलढाणा जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक आणि विक्रीविरोधात विशेष मोहीम राबवून मोठी कारवाई केली आहे. २९ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईत ११० गुन्हे नोंदविण्यात आले असून १०८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच ९ वाहने जप्त करून एकूण १४ लाख ६८ हजार ४४५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बुलढाणा, देऊळगाव राजा, खामगाव आणि भरारी पथकातील अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील विविध हातभट्टी केंद्रे आणि अवैध मद्यविक्रीच्या ठिकाणांवर छापे टाकले. भिलवाडा, डोंगरखंडाळा, सुंदरखेड, बोराखेडी, मातला, बोरी आडगाव, देवघाबा, उंबरखेड शिवार, कोलवड, रणथम, जामोद, सुनगाव, गवळीपूरा, शहापूर, मानसगाव, शिरोळा, खामखेड आणि कवठळ आदी भागांत ही कारवाई करण्यात आली. ही मोहीम डॉ. राजेश देशमुख (आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य), प्रसाद सुर्वे (सह आयुक्त, अंमलबजावणी व दक्षता), डॉ. पराग नवलकर (विभागीय उपआयुक्त, अमरावती विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच चारुदत्त हांडे (अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा) यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आली. दरम्यान, जिल्ह्यातील अनुज्ञप्तीधारकांकडून नियमांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. विना मद्यसेवन परवाना मद्यविक्री, अल्पवयीनांना मद्य उपलब्ध करून देणे किंवा निर्धारित वेळेपेक्षा आधी अथवा नंतर मद्यविक्री केल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा विभागाने दिला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने नागरिकांनाही अवैध मद्यविक्री, हातभट्टी, हॉटेल-धाब्यांमधील बेकायदेशीर मद्यव्यवहार अथवा वाहतुकीबाबत माहिती देण्याचे आवाहन केले आहे. यासाठी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९, व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ तसेच विभागाच्या ऑनलाइन पोर्टलवर तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ङ्गङ्घअवैध मद्यविक्री व हातभट्टी निर्मूलनासाठी जिल्ह्यातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार आहेत, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे.

# राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचा जिल्हा दौरा

जनसंचलन/बुलढाणा



राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती. विजया रहाटकर हे शुक्रवार दि. १९ जुन २०२६ रोजी बुलढाणा दौऱ्यावर येत आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार शुक्रवार दि. १९ जुन रोजी सकाळी ११.३० वाजता संभाजीनगर येथून बुलढाणा येथे आगमन व दुपारी १२ वाजता रामजी हॉल चिखली रोड, बुलढाणा येथे भेट. दुपारी २ वाजता जिल्ह्यातील पोलीस व प्रशासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक. बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद. दुपारी ४ वाजता कारागृह भेट. सायंकाळी ५ वाजता संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

# बुलढाण्यात कॅन्सर व्हॅन जनजागृती व मोफत तपासणी मोहिमेचा शुभारंभ



जनसंचलन/बुलढाणा

राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग () कार्यक्रमांतर्गत बुलढाणा जिल्ह्यात कॅन्सर जनजागृती व मोफत तपासणी मोहिमेचा शुभारंभ आज जिल्हा रुग्णालय, बुलढाणा येथे करण्यात आला. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या प्रमुख उपस्थितीत या विशेष मोहिमेला प्रारंभ झाला. या मोहिमेअंतर्गत विशेष कॅन्सर तपासणी व्हॅन १५ जून ते १५ जुलै २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात भ्रमण करून नागरिकांची मोफत तपासणी करणार आहे. स्तनाचा कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग आणि तोंडाचा कर्करोग यांचे लवकर निदान करण्यासाठी विविध ठिकाणी विशेष तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. उद्घाटन कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रंजीत मंडाले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण घोंगटे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र सरपाते, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मनीषा चव्हाण, दंतशल्यचिकित्सक डॉ. विष्णु सोळंकी, डॉ. सय्यद अरशद, डॉ. अश्विनी लहाने यांच्यासह कॅन्सर व्हॅनमधील वैद्यकीय अधिकारी, दंतचिकित्सक, परिचारिका, समुदाय आरोग्य अधिकारी () आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. मोहिमेदरम्यान स्त्रीरोगतज्ज्ञांकडून गर्भाशय मुख व स्तन कर्करोगाची तपासणी, तर दंतचिकित्सकांकडून तोंडाच्या कर्करोगाची तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीत संशयित आढळणाऱ्या रुग्णांची नोंदणी करून त्यांना पुढील निदान व उपचारासाठी आवश्यक मार्गदर्शनही दिले जाणार आहे. गावपातळीवरील समुदाय आरोग्य अधिकारी, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी नागरिकांना तपासणीसाठी प्रोत्साहित करून मोहिमेच्या यशासाठी सक्रिय सहभाग नोंदविणार आहेत. यावेळी बोलताना डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी कर्करोगाचे लवकर निदान हे प्रभावी उपचारासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. नागरिकांनी मोफत तपासणी सुविधेचा लाभ घेऊन नियमित आरोग्य तपासणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या संयुक्त प्रयत्नातून राबविण्यात येणारी ही मोहीम जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्य संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# शेतकरी आक्रोशाचा एल्गार १८ जूनला मेहकरमध्ये शिवसेनेचा विराट मोर्चा; आ. सिद्धार्थ खरात यांचा सरकारवर हल्लाबोल...

## आ. सिद्धार्थ खरात यांचा सरकारवर घणाघात; अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत हजारो शेतकरी उतरणार रस्त्यावर

**जनसंचलन/मेहकर**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेला शेतकरी कर्जमुक्तीचा शासन निर्णय हा प्रत्यक्षात कर्जमुक्ती नसून शेतकऱ्यांची दिशाभूल करणारा आणि कर्जवसुलीला चालना देणारा निर्णय असल्याची जोरदार टीका आमदार सिद्धार्थ खरात यांनी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सरकारचे अपयश उघड झाले असून त्याविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने १८ जून रोजी मेहकर येथे विराट आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. मेहकर व लोणार येथे आयोजित बैठकीत बोलताना आ. खरात म्हणाले की, सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांना मोठमोठी आश्वासने देणाऱ्या सरकारने आता त्यांच्याकडे पूर्णपणे पाठ फिरवली आहे. अतिवृष्टीची मदत, पीक विमा, शेतमालाला हमीभाव यांसारखे प्रश्न अद्यापही प्रलंबित आहेत. त्यातच कर्जमुक्तीच्या नावाखाली शेतकऱ्यांवर नव्या अटी-शर्ती लादून आर्थिक भार वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी सरसकट देण्यात आली होती. मात्र नव्या निर्णयात १ एप्रिल २०१९ पूर्वीचे कर्ज वगळण्यात आले असून दोन लाखांपेक्षा जास्त कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना आधी थकबाकी भरण्याची अट घालण्यात आली आहे. त्यामुळे हजारो शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार असल्याचा दावा त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि सरकारला जाब विचारण्यासाठी १८ जून रोजी सकाळी १० वाजता मेहकर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार नितीन देशमुख, संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवंत यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो शेतकरी सहभागी होणार आहेत. या बैठकीस जिल्हा उपप्रमुख





प्रा.आशिष रहाटे, तालुकाध्यक्ष निंबाजी पांडव, लोणारचे तालुकाप्रमुख राजू बुधवंत, युवासेना तालुकाप्रमुख अँड आकाश घोडे, नगराध्यक्ष किशोर गारोळे. महिलाआघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह लोणार व मेहकर येथील शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी व न्यायासाठी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन आ. सिद्धार्थ खरात यांनी केले.

# भीक द्या कंगाल सरकारसाठी भीक द्या! बुलढाण्यात शेतकऱ्यांचे अनोखे भीक मागो आंदोलन; तुपकरांच्या अन्नत्यागाला वाढता पाठिंबा

**जनसंचलन/बुलढाणा**

सरसकट कर्जमुक्ती, हक्काचा पीकविमा आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाचा आज दुसरा दिवस असतानाही सरकारने अद्याप दखल न घेतल्याने शेतकरी संतापले आहेत. याच संतापातून आज बुलढाण्यात शेतकऱ्यांनी सरकारविरोधात अनोखे आणि आक्रमक भीक मागो आंदोलन केले. भीक द्या, भीक द्या कंगाल सरकारला भीक द्या!फ्र अशा घोषणा देत शेकडो शेतकरी व कार्यकर्त्यांनी शहरातील मुख्य बाजारपेठेतून फ
री काढली. अॅड. शर्वरी तुपकर आणि क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. दुकानदार, व्यापारी आणि नागरिकांनी झोळीत पैसे टाकून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.




आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे की, उद्योगपतींची कोट्यवधींची कर्जे माफ करण्यासाठी सरकारकडे पैसा आहे; मात्र अन्नदात्या शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी अटी-शर्तींचा डोंगर उभा केला जात आहे.शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी सरकारकडे पैसे नसतील, तर आमच्याकडून भीक घ्या; पण शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती द्या, असा संतप्त संदेश यावेळी देण्यात आला. मुख्य बाजारपेठेतून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देताना पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना अडविल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. नंतर निवडक प्रतिनिधींना आत सोडण्यात आले. आंदोलनादरम्यान जमा झालेली रक्कम आणि मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला देण्यात आले. शासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर राज्यभरातील शेतकरी रस्त्यावर उतरतील आणि आंदोलनाची धग संपूर्ण महाराष्ट्रात पेटेल, असा कडक इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेने दिला आहे.

# रविकांत तुपकरांचे अन्नत्याग आंदोलन चिघळले! किनगाव जट्टू येथे शेतकरी आंदोलकांनी एसटी बस पेटवली...

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी कालपासून सुरू केलेले अन्नत्याग आंदोलन आज दुसऱ्या दिवशी चिघळले आहे. शेतकरी आंदोलकांनी आत्ता थोड्या वेळापूर्वी एसटी बस पेटवून दिल्याची माहिती समोर आली आहे. लोणार आगाराची एसटी बस किनगाव जट्टू मुक्कामी गेली होती.त्यावेळी हा प्रकार घडल्याचे समोर येत आहे... शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती व्हावी यासाठी रविकांत तुपकर काल,१५ जूनपासून अन्नत्याग आंदोलनाला बसले आहेत. या अन्नत्याग आंदोलनाकडे प्रशासनाच्या वतीने होणाऱ्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांच्या भावना उफाळून आल्या आहेत. दिवसभरात ठिकठिकाणी आंदोलकांनी फसव्या कर्जमाफीचा जीआर जाळला. काही ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुतळा जाळल्याच्या घटना



समोर आल्या.दरम्यान आत्ता १६ जूनच्या रात्री,साडेदहाच्या सुमारास थोड्या वेळापूर्वी किनगाव जट्टू येथे पेटवल्याची घटना समोर आली आहे. लोणार आगाराची ही बस किनगाव जट्टू येथे मुक्कामी गेली होती,त्यावेळी आंदोलकांनी ही बस पेटवून दिल्याचे समोर आले आहे..

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८